विद्या बाळ अध्यासन प्रकल्प - २ \ # हॅशटॅग लैंगिकता



मनीषा गुप्ते

# लैंगिकता आणि स्त्री चळवळ : भाग १

## मुलाखत : मनीषा गुप्ते  मुलाखतकार आणि शब्दांकन : हिना कौसर खान

**मनीषा गुप्ते मासूम या संस्थेची संस्थापक आणि स्त्रियांचं आरोग्य-लैंगिकता यावर स्त्रीवादी दृष्टिकोनातून खोलवर अभ्यास असलेली कार्यकर्ती. मासूमचं काम पुणे जिल्ह्यातल्या अनेक खेडोपाडी, वाड्यावस्त्यांमध्ये गेल्या अनेक वर्षांपासून चालतं आहे. त्यातून आलेले जमिनीवरचे अनुभव-स्त्रियांचं उपजत शहाणपण-परिस्थितीनं तिला उचलावं लागलेलं पाऊल यामुळं या ग्रामीण स्त्रियांना लैंगिकता ही गोष्ट अभ्यास म्हणून समजत नसली तरी रोजच्या जगण्यातून आलेलं शहाणपण अचंबित करणारं आहे. मनीषानं हा धागा पकडून लैंगिकता आणि त्याला जोडून येणाऱ्या रोजच्या जीवनातल्या गोष्टींची उकल केली आहे. तरुण पत्रकार, लेखिका आणि आरोग्यसेवेत कार्यरत असणारी हिना हिनं अचूक प्रश्न विचारत तिला बोलतं केल्याचं नक्की जाणवतं. ८ मार्च जागतिक महिला दिनानिमित्त आमच्या शरीरावर आमचा हक्क याला अधोरेखित करत  तीन भागात असणारी ही मुलाखत जरूर वाचा आणि आपले अभिप्राय जरूर कळवा.**

स्त्रीवादी चळवळ आणि लैंगिकता या विषयातील परस्पर संबंध समजून घ्यायचा असेल तर आधी लैंगिकता, त्यातले स्तर, लैंगिक नियंत्रण कशासाठी आणि कोणासाठी हे सारं समजून घेणे गरजेचं आहे.

मी काम करत असताना गावात अनुभवलेलं एक उदाहरण सांगते. एक बाई तिच्या मुलीला शाळेतून काढून टाकत होती. मी नुकतीच त्या गावात राहायला गेले होते. महिना दोन महिने झाले असतील. आपली शहरी पठडी असते. मी म्हटलं, "का शाळेतून काढून टाकताय?" "लग्नासाठी..." म्हटलं "लग्न कशाला शिकू दे ना" मी आपलं टिपिकल प्रबोधन, हेल्थ एज्युकेशन अशा मोडमध्ये. ती म्हणाली, "तिचं पोट वाढलं तर तू बघणार आहेस का?" ताबडतोब माझ्या डोक्यात गर्भनिरोधक वगैरे... माझी गाडी कुठल्या रूळावर आणि तिची गाडी कुठल्या रुळावर! मग ती म्हणाली, "शाळेकडे जाताना बाजरीची शेतं आहेत. वाटेवर कोणी जर पोरीला खेचला आत आणि तिच्या आयुष्याचा इस्कोट केला तर? आणि रांड स्वतः चालत गेली तर?" म्हणजे खेचला तर इस्कोट झाला. ती विक्टिम आहे. स्वतः चालत गेली तर रांड. आज पण बलात्कार झालेल्या बाईवरती आपण हिंसेची चिन्हं बघतो तेव्हा म्हणतो भीषण बलात्कार. प्रत्येक बलात्कार भीषणच आहे. मारून टाकणं हे जास्त मोठं आहे. बलात्काराला तुम्ही बलात्कार म्हणून बघा. दादा धर्माधिकारी म्हणायचे की ज्या दिवशी बलात्काराला आपण एक भीषण शारीरिक हिंसाचार म्हणून बघायला लागू त्या त्या वेळेला पहिल्यांदा बलात्कार झालेल्या व्यक्तीला न्याय मिळेल. म्हणजे एकाही जखम नसेल माझ्या अंगावर तो बलात्कार नव्हता का? माझा नवरा पोलीस कोठडीत आहे. त्याला बोलण्यासाठी माझ्यावर बलात्कार करतात. माझं मूल उपाशी आहे मी कोणाकडे तरी एका कामासाठी गेले आणि त्याने बलात्कार केला. इथे कन्सेंटचा मुद्दा येतो. कन्सेंट नाही म्हणजे बलात्कार आणि एका गोष्टीला कन्सेंट म्हणजे दुसऱ्याला नाही किंवा या विशिष्ट नात्यातल्या आपल्या या फेजमध्ये असलेला कन्सेंट हा पुढेही आहे हे आपण गृहीत नाही धरू शकत. पितृसत्तेने बायको म्हणून शिक्का मारला की तो कन्सेंटच निघून जातो. लैंगिकतेबाबत जागोजागी पितृसत्ता येते.

आता आपण एखाद्याचा फोन उचलताना किंवा पेन घेताना सुद्धा परवानगी विचारतो. मग लैंगिकतेच्या बाबतीमध्ये तो कन्सेंट का येत नाही? इंग्रजीत एक म्हण आहे. 'द स्ट्रॉंगेस्ट चेन इज ॲज स्ट्रॉंग ॲज इट्स विकेस्ट लिंक'. तर पितृसत्तेची विकेस्ट लिंक लैंगिकता आहे. विवाह व्यवस्था तिने निर्माण केली, ती का केली? कुटुंबात मुलगा जन्माला घालणे यासाठी. पितृसत्ता ही आर्थिक व्यवस्थाही आहे. पणजोबा, आजोबा, वडील, मुलगा, नातू, पणतू या अबाधित रांगेमधून एक ... दिसते प्रॉपर्टीची. पितृसत्तेमध्ये मी पुरुष आहे, तू पुरुष आहेस तर माझी प्रॉपर्टी तुझ्या मुलाला असं चालत नाही. पण समजा मला याची खात्री नाही की हे माझं मूल आहे तर ती लैंगिकता ही पितृसत्तेची विकेस्ट लिंक आहे. आमच्या गावामध्ये म्हणतात की, 'माय म्हणेल तो बाप.' पुरुष खरंतर प्रजोत्पादनात

०.१ टक्का योगदान करतो आणि मोकळा होतो. स्त्रीचं मात्र शरीर बदलतं. तिच्या छातीला दूध येतं. वर्षभर तिच्या शरीरात बदल होतात. पुरुषाच्या बाबतीत असं काहीच होत नाही. त्यामुळे मातृत्व सिद्ध आहे. पितृत्व हा फक्त विश्वास आहे किंवा अविश्वास आहे, त्या पलीकडे काहीच नाही. म्हणून लैंगिकतेवर इतकं नियंत्रण आहे. त्या इतक्या सुंदर गोष्टीला का घाणेरडं केलेलं आहे? लग्नाच्या आधी योनीशुचिता का? कारण ते परक्याचे धन आहे. त्याची राखण स्त्रीने केली पाहिजे. समजा, एखाद्या आईला तिची मुलगी जर लग्नासाठी कोणाला द्यायची असेल तर ती शुद्ध आहे याची त्यांना खात्री पटायला पाहिजे. त्यासाठी त्या आईने तिच्या बीजामध्ये भेसळ आणलेली नाही याची देखील काळजी घेतली पाहिजे. मग सोशल कॉन्ट्रॅक्ट थेअरीमध्ये रेसिप्रोकेशन आहे. त्यामुळं इतरही बायांना/आयांना त्यांच्या मुली तशाच 'शुद्ध' द्याव्या लागतील. म्हणून आपण त्या परक्याच्या धनाची काळजी लग्नाच्या आधी घेतो. तिला कोणतीही लैंगिक चव लागता कामा नये. तिला नवऱ्याच्या पलीकडे कुणाचा अनुभव असता कामा नये. जे आहे ते सर्वांचं असंच असतं अशा भोंदू संकल्पनेत तिने राहायचं. कारण ते मुळात प्रेमासाठी नाही तर पुढची पिढी जन्माला घालण्यासाठी आहे. रोटी बेटी व्यवहार. तो तुम्ही कोणासोबत करत आहे, ती तुमची ओळख आहे. पुरुषाला त्याचे पितृत्व एकाच पद्धतीने सिद्ध करता येतं. जगातल्या सहा बिलियन लोकांपैकी तीन बिलियन पुरुष आहेत. तर तीन बिलियन वजा एक इतक्या पुरुषांशी तिने संबंध ठेवला नसेल तर ते माझं आहे. पण तसं शक्य करणं सोपं नाही म्हणून लैंगिकतेची इतकी भीती आहे. आणि पर्यायाने स्त्रियांच्या लैंगिकतेवर नियंत्रण मिळवण्यासाठी झटायचे.

त्यासाठी सगळे धर्मगुरूदेखील एकत्र येतील. एरवी धर्मगुरू इतर गोष्टींबाबत एकमेकांचे गळे धरत असतील पण लोकशाही विरोध आणि स्त्री स्वातंत्र्य विरोध याबाबतीत ते समान आहेत. एका अर्थाने ते सगळे बंधू आहेत. आणि त्यांची बंधुता फार खरी आहे, कारण त्यांना गर्भाशय नाहीये. त्यामुळे उद्या त्यांना मातृत्व येण्याची शक्यता फार कमी आहे. पण स्त्रीच्या गर्भाशयाच्या बाबतीत निर्णय ते ठरवणार. कारण बाईला ती मोकळीक मिळाली तर पितृसत्तेचा अख्खा वाडा कोसळेल. तो एका गवताच्या काडीवर उभा आहे. ती गवताची काडी म्हणजे लैंगिकता.

बायबलमध्ये ॲडम आणि इव्हला देवाने शिक्षा का केली? लैंगिक संबंध ठेवले म्हणून. इव्हच्या बाबतीत जास्त राग का? कारण तिने लैंगिकता शिकवली अशी धारणा. देवाने सांगितलं या झाडाची फळं खाल्लीत तर मराल, लैंगिक संबंध ठेवले तर मराल. आजही हेच म्हटलं जातं. ॲडम आणि इव्हने लैंगिक संबंध ठेवले तर ते मेले का? म्हणजे देव खोटं बोलला. उलट आधी ते दोघे नग्न फिरत होते, त्या ऐवजी त्यांना अंजिराचं पान लैंगिक अवयवावर लावावं लागलं. जेव्हा लैंगिकतेला घाणेरडं केलं त्यानंतर या सुंदर नग्न शरीरावर कपडे घालावे लागले. अर्थात त्यामुळेच आपण विपरीत परिस्थितीत (गारठा, पाऊस, उष्णता) जगलो आणि आपली उत्क्रांती झाली हेही खरं. जन्माला येतो तेव्हा नागडं असणं हे स्वाभाविक आहे. पण नग्नता हे सोशल कन्स्ट्रक्ट आहे. पुरुषांची नजर वाईट आहे, म्हणून बाईच्या अंगावरती चार कपडे घाला. केव्हा आणि कोणासाठी तिचे कपडे उतरवायचे, नवऱ्यासाठी की बाजारपेठेसाठी हे ती ठरवणार नाही. आणि तिच्यावर लैंगिक अत्याचार का करायचे? दंगलींमध्ये, युद्धामध्ये बलात्कार छळवणूक म्हणून का वापरला

जातो? त्या पूर्ण समूहाची ओळख एका बीजावरून ठरलेली आहे. आता तुमच्या त्या बीजामध्ये आम्ही आमचं बीज टाकलं. आता तुम्ही तुम्ही आहात का? जेव्हा मी माणूस असेल तेव्हा मला याचा फरक नाही पडणार. मुळात स्त्री हे जातीव्यवस्थेचे प्रवेशद्वार मानले गेले आहे आणि म्हणून तिच्या योनीच्या भोवती कुंपणे आहेत. तिच्या आत कोणत्या पुरुषाचं बीज जाणार आणि कोणाचं मूल बाहेर येणार हे नियंत्रित केलं जातं. नाहीतर जातीचं पुनरुत्पादन होणार कसं? म्हणून बाबासाहेब म्हणतात की कास्ट इज एंडोगामी अँड एंडोगामी इज कास्ट. जातीचं पुनरुत्पादन करायचं तर आपल्याच जातीतल्या बाईचा गर्भ पाहिजे. जात पुढे गेली पाहिजे म्हणून स्त्रीने तेवढ्या प्रमाणात शिक्षितही पाहिजे. आपल्या पुढच्या पिढीला तिने फार मागे नेता कामा नये. पण मुळात ती फक्त मूल जन्माला घालण्यासाठी पाहिजे.

आयुष्यातला हा बहुतेक एकच अनुभव असेल की ज्याच्यामध्ये तुमच्यावर केलेली बळजबरीही तुम्ही मान्यता देण्यापेक्षा जास्त चांगली मानली जाते. म्हणून मुलींनी सुरुवातीला नाहीच म्हणायचं. हिंदी फिल्मसारखं. आणि मुलांना आपण काय शिकवतो? "एकदा नाही म्हटलं आणि तू मान्य केलंस? तू काय मर्द आहेस की नाहीस?" कोणत्या वेळेला तो 'स्टॉकिंग' करतो आहे असं म्हटलं जाऊ शकतं, कोणत्या वेळेला त्याला 'हिंसक' म्हटलं जाऊ शकतं, कोणत्या वेळेला तो 'बलात्कारी' आहे असं म्हटलं जाऊ शकतं यात आपण संभ्रम निर्माण करतो आहोत आणि तिने नाही म्हटलं तरी तिला 'हो'च म्हणायचं होतं. लैंगिकतेच्या बाबतीत तिचा नाही म्हणण्याचा अधिकार केव्हा मान्य केला जाईल? जेव्हा तिला हो म्हणण्याचा अधिकार असेल तेव्हा. जेव्हा ती स्वतःहून लैंगिक संबंध प्रस्थापित करील. तेव्हा तिचा 'नाही' समाजात समजला जाईल तो पितृसत्तेत द्यायचा नाहीये. इथे पुन्हा व्यवस्थेशी संबंध आला.

ब्रिटिश यायच्या आधी इथल्या संस्कृतीमध्ये फक्त दोनच जेंडर्स नव्हती, तर अनेक जेंडर्स होती. इंडोनेशियामध्ये किंवा थायलंडमध्ये अनेक जेंडर आहेत. त्यांना काही विशिष्ट आकडाही नाही. लैंगिकतेचेही खूप प्रकार आहेत. पण युरोपमधल्या ज्या बाल्कन स्टेट्स आहेत, तिथे sworn virgin किंवा virgin of the balkan असा प्रकार आहे. एखाद्या घरात पुरुष नसेल, फक्त बाई असेल तर ते जास्त सोपं होतं. मग ती लग्न करत नाही, पुरुषासारखे कपडे घालायला लागते. ती पुरुष आहे असं मानलं जातं. ती पुरुषांसोबत क्लबमध्ये जाऊ शकते, सिगरेट ओढू शकते, बियर पिऊ शकते. पण ती योनीसंबंध ठेवू शकत नाही. नंतर मात्र ती जर म्हणाली की, मी बाई आहे तर मात्र ती चेटकीण समजली जाते. पूर्वी युरोपमध्ये अशा स्त्रियांना प्रचंड अत्याचार करून जाळून टाकलं जायचं. हजार वर्षांच्या काळामध्ये अशा लाखो स्त्रियांना जाळून टाकण्यात आलेलं आहे. त्यातल्या बहुसंख्य स्त्रिया दाई किंवा सुईणी होत्या. त्या गर्भनिरोधक द्यायच्या किंवा गर्भ समाप्तीसाठी औषध द्यायच्या. त्यांना बाईच्या शरीरातल्या या अंधाऱ्या गुहेमधलं कळतं म्हणजे त्यांचा सैतानाशी संबंध आहे असं समजून त्यांना मारलं जायचं. त्या कब्रस्तानात जातात, सैतानाशी संभोग करतात अशा पोर्नोग्राफिक कहाण्या चर्चनेच पसरवल्या होत्या. भारतामध्येसुद्धा डाकीण किंवा भुताळी असा प्रकार आहे. जिथे आदिवासी समूहाचा अन्नपुरवठा संपतो तिथे कोणावर तरी राग काढायचा म्हणून हे प्रकार चालतात. युरोपमध्ये अशा कथित चेटकिणींना पकडल्यानंतर त्यांचा अतोनात छळ केला जायचा आणि त्यांना म्हटलं जायचं की अजून चार जणांची नाव सांग. तिने नावे सांगितली की तिला जाळून टाकलं जायचं. असं कॅथलिक चर्चचं अनेक वर्ष चालू होतं. तर त्या काळात पुरुष किंवा स्त्री असणं याचा संबंध धर्माशी होता. धार्मिक गुरू ठरवायचा की अमुक मूल इंटरसेक्स आहे. मुल इंटरसेक्स असेल तर प्रॉपर्टीमध्ये हिस्सा मिळणार की नाही हा कायदेशीर प्रश्न झाला. विसाव्या शतकात हे डॉक्टरकडे आलं. (स्त्री आरोग्य सेविकांना मारून, आज ज्याला आपण ॲलोपथी म्हणतो ती पुरुषांकडे गेली. आपल्याकडे आयुर्वेद हे ब्राम्हणी वेदांतून आलेलं आहे. दुसरीकडे गावातून आलेले वैदू यांच्याकडचं ज्ञान आहे. त्याकडे लक्ष न दिल्यामुळे ते खरंच आता अंधश्रद्धाळू झालं आहे. काहीही खोटी जडीबुटी दुसऱ्या नावाने विकली जाते.) तोपर्यंत फक्त धर्मगुरू किंवा वकील हे लिंग बघून किंवा बाहेरून कळलं तर प्रॉपर्टीमध्ये हिस्सा कुणाला अंदाजाने सांगायचे. डॉक्टर मात्र ते फिक्स करू शकत होता.

आता बघा, मूल जन्माला येतं. कोणी विचारलं डोळ्याचा रंग कसा आहे? तर आपण विचारणारी आत्या आहे की आतेसासू आहे यावर उत्तर देतो. काहीवेळा म्हणतो अजून कळत नाही, उद्या परवा सांगेन. पण कुणी विचारलं की मुलगा आहे की मुलगी तर आपण असं म्हणतो का की उद्या सांगेन? आई जिवंत आहे की नाही हे विचारण्याआधीच मुलगा की मुलगी हे विचारलं जातं. त्यातही एकदा नापास झाली तर दोन-तीन चान्स दिले जातात नाहीतर मग दुसरं लग्न. पहिली मुलगी झाली तर निदान 'धन की पेटी' वगैरे. दुसरी, तिसरी झाली तर तिच्याबद्दल काहीच नाहीये. पहिला बेटा असं का म्हणत नाहीत? पहिली बेटी, मग ती तीन भावांनंतर झाली तरीही तिचा त्रासच आहे. म्हणजे आपल्याकडे 'son wantedness' आहे असं नाही तर 'daughter unwantedness' पण आहे. तिच्या लग्नाच्या वेळी जी मानहानी होते किंवा ती पळून गेल्यानंतर कुटुंबाच्या इभ्रतीला जो धक्का पोहचतो, किंवा लग्न न झालेली मुलगी म्हणजे तळहातावरचा निखारा हे जे सगळं आहे त्यामुळे मुलगी नकोच. आणि झालीच तर एखादी. म्हणजे मी कन्यादान करून स्वर्गात पुण्य मिळवू शकतो. पण ती माझीच असली पाहिजे असं नाही. भावाचीही असू शकते. माझे अंत्यसंस्कार मात्र माझ्या

मुलाशिवाय कुणी करू शकत नाही कारण ते माझ्या प्रॉपर्टीशी संबंधित आहे. धर्मांची थोतांड पितृसत्तेशी जोडली आहेत. सर्वच धर्मांमध्ये आपल्याला हे दिसतं.

बाळाने पहिला श्वास घेतला की त्याला मानवी अधिकार लागू होतात. त्याला मग मी जर काही केलं तर तो खून आहे. पोटात असताना नव्हे, तेव्हा ती गर्भ समाप्ती आहे. तर, आठ-दहा तासांच्या एका मानवाचं शरीर अशा पद्धतीने बदलायच की ते पुन्हा पूर्ववत होणार नाही. या लिंग बदलाच्या शस्त्रक्रियापेक्षा मोठा बाल लैंगिक अत्याचार कोणता? हे डॉक्टर करू शकतात.

मग डॉक्टर ते कसे ठरवतात. तुम्हाला दोन मुली असतील आणि पुन्हा मुलगी झाली तर तिचा क्लीटरस थोडासा वाढवून आपण तिचा मुलगा करू. किंवा तुम्हाला दोन मुलगे आहेत आणि पुन्हा मुलगा झाला, त्याचं शिश्न अगदीच लहान आहे तर त्याची कातडी वापरून आपण योनी करू किंवा ते कापूनच टाकू. अशा प्रकारच्या शस्त्रक्रिया केल्या जातात. त्यामुळे आपल्याला मिश्रलिंगी व्यक्ती दिसत नाहीत. स्टॅटिस्टिकली एक ते तीन टक्के लोक मिश्रलिंगी असतात. पण ते आपल्याला कधीही दिसत नाहीत. त्यामागचं एक कारण हे आहे. सध्या असा कोणता सपोर्ट ग्रुपसुद्धा नाही. कारण सगळेच हे लपवत आहेत. हा इंटरसेक्स लोकांचा एक प्रकार.

कदाचित बाहेरून सगळं बरोबर असेल. पण आतमध्ये गर्भाशय किंवा अंडाशयच नाहीयेत. किंवा बीजवाहक नलिका नाही. किंवा, बाहेर शिश्न आहे पण आत एका स्त्रीचं अंडाशय सापडलं. किंवा अर्धवट गर्भाशय सापडलं. आपल्यापैकी किती लोक आयुष्यात अल्ट्रासाऊंड चाचणी करून घेतात? गरज पडली नाही तर कधीच करून घेत नाहीत. एखादी मुलगी वीस-बावीस वर्षांची होते आणि तिला पाळी येत नाही तेव्हा ती चाचणी केली जाते. मग आधी ती मुलगी होती आणि त्यानंतर ती इंटरसेक्स झाली का? या प्रश्नांची आपल्याकडे उत्तरे नाहीत. पण शेवटी सगळी माणसंच आहेत. एखादी व्यक्ती इंटरसेक्स आहे किंवा ट्रान्सजेंडर आहे असे कळले त्याने फरक काय पडतो? आपण एकमेकांना माणूस म्हणून ओळखतो, त्याचं काय होतं त्या क्षणांमध्ये? त्या आधी तुम्ही जे होतात तेच तुम्ही आता आहात. मग फरक काय पडला? प्रेम इतकं कंडिशनल असतं का? अमीर खुसरो म्हणतात,

खुसरो दरिया प्रेम का उलटी वाकी धार
जो उभरा सो डूब गया जो डुबा सो पार

प्रेमाच्या नदीमध्ये तुम्ही बुडी मारली तरच तुम्ही पार होता. प्रेम पोथीच्या पलीकडचं आहे. ज्याला 'ढाई अक्षर प्रेम के' हे कळलं तो सगळ्यात मोठा ज्ञानी. ज्यांच्याबरोबर तुम्ही इतकी वर्ष एकत्र काढलीत त्यांच्याबरोबरचं तुमचं प्रेम इतकं कंडिशनल का होतं? आपण टोकाचे विचार करतो त्या वेळेला आपल्याला मध्य किती नासलेला आहे हे कळतं.

Perving Gofman ने Stigma नावाचं एक पुस्तक लिहिलं आहे. समाजामध्ये एका क्षेत्रामध्ये जर स्टिगमा असेल, लांच्छन असेल तर ती दुसरीकडे लागते. टी. बी. असेल तर एचआयव्हीला लागेल. ट्रान्सजेंडरला असेल तर बाई घराबाहेर पडण्याला ही लागेल.

*मनीषा गुप्ते, मासूम संस्था, पुणे*
*manishagupte@gmail.com*
*शब्दांकन : हिनाकौसर खान*
*greenheena@gmail.com*